# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २७९/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. राजेश राणे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-५ (प)**
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडाचा घटक, रुम नं.५३७, ४ था मजला,
गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प.)**
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडाचा घटक,
गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २५.०६.२०२६</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १६.०६.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.१२.२०२० रोजी पुढीलप्रमाणे आदेशित केले होते:-

*"जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलकर्त्यास १५ दिवसांत निशुल्क उपलब्ध करुन द्यावी."*

२. तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे माहिती मिळालेली नाही म्हणून आयोगाकडे दि. १०.०८.२०२१ रोजी तक्रार दाखल केली. तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाने दि. ३०.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता- ५ (पश्चिम विभाग), मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई यांच्याकडून अहवाल मागितला. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता- ५ (पश्चिम विभाग), मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई यांच्याकडून आयोगास दि. ३०.०६.२०२२ रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे.

३. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता सुनावणी नोटीस प्राप्त असूनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २४.०६.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर नस्ती Scanning साठी महापे येथे पाठविल्याने तक्रारकर्ता यांना विहित वेळेत माहिती उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही. नंतर सदर कामाची नस्ती प्राप्त झाल्यावर तक्रारकर्ता यांना माहिती अर्जातील मुदा क्र. १ ते ४ व ७ बाबतची माहिती सी.डी. स्वरुपात दि.०१.०९.२०२१ रोजी व मुद्दा क्र. ५, ६ व ८ बाबतची माहिती सी.डी. स्वरुपात दि. ०५.१०.२०२१ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

..२/-

४. जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांनी सदर माहिती प्राप्त केल्याची दि. ०१.०९.२०२१ व ०५.१०.२०२१ रोजीची स्वाक्षरी असलेली नोंदही आयोगास सादर केली.

५. या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission
सत्यमेव जयते
Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : २५.०६.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**